# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District** (जिल्हा): सातारा    **P.S.**(ठाणे): म्हसवड    **Year** (वर्ष): 2020

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0148    **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 04/07/2020 08:50 बजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार    **Date From** (दिनांक पासून): 03/07/2020

**Time Period** (कालावधी): पहर 7    **Date To** ( दिनांक पर्यंत): 03/07/2020

**Time From** (वेळेपासून): 20:12 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 20:12 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 04/07/2020    **Time** (वेळ): 08:36 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 005    **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 04/07/2020 08:36 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): म्हसवड,माण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भारत बाबा शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992    (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):    **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.**(अ. | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पाणवन,माण,म्हसवड ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पाणवन,माण,म्हसवड ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल अदीनाथ खाडे | | | 1. पळशी,माण,म्हसवड ,सातारा,महाराष्ट्र, भारत |
| 2 | जयराम विठ्ठल शिंदे | | | 1. पाणवन,माण,म्हसवड ,सातारा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब ता.04/07/2020मी भारत बाबा शिंदे वय 28 वर्ष व्यवसाय:- शेती रा. पाणवन ता. माण जि. सातारा मोबाईल नंबर. 8050712071.मी वरील प्रमाणे असून मी वरील ठिकाणी माझी आई, पत्नी, एक मुलगी, एक मुलगा असे एकत्र राहण्यास आहे. माझी पाणवन ता. माण जि. सातारा या ठिकाणी साडेचार एकर शेत जमीन असून सदर शेतजमीनीस लागून ओढा जातो. सदर ओढयामध्ये बांधकामास लागणारी वाळू उपलब्ध आहे.सात महिण्यापुर्वी मी पाणवन या ठिकाणी माझ्या घरालगत जनावरांसाठी गोठा बांधण्याचे ठरवले होते. सदर गोठयाचे बांधकामासाठी मी माझ्या शेतमी भारत बाबा शिंदे वय 28 वर्ष व्यवसाय:- शेती रा. पाणवन ता. माण जि. सातारा मोबाईल नंबर. 8050712071.जमीनीलगत असलेले ओढ्यामधून वाळू घेण्याचे ठरवून ओढयातील वाळू उपसा करून मी माझे चुलत भाऊ श्री.रामू भगवान शिंदे यांचे मालकीच्या ट्रक्टर - ट्रली मधून सदरची वाळू माझ्या गोठयाचे बांधकामा करिता घेवून जात होतो. त्यावेळी म्हसवड पोलीस ठाणेमधील पोलीस कर्मचारी यांनी आमचा ट्रक्टर आडवून विना परवाना वाळू उपसा केल्याबद्दल माझ्यावर कारवाई केली होती. त्यावेळी आमचा ट्रक्टर व ट्रली पोलीसांनी घेवून जावून पोलीस ठाणेचे परिसरात लावली होती. त्यावेळी आम्ही आमचा ट्रक्टर सोडवून आणलामी भारत बाबा शिंदे वय 28 वर्ष व्यवसाय:- शेती रा. पाणवन ता. माण जि. सातारा मोबाईल नंबर. 8050712071. होता परंतू ट्रक्टरची ट्रली पोलीसांनी सोडली नाही. सदरची ट्रली अद्याप म्हसवड पोलीस ठाणेचे परिसरातच आहे.त्यानंतर मागील आठ दिवसापुर्वी मी माझ्या घरी असताना दुपारी साडे चार वाजण्याचे सुमारास एक अनोळखी इसम माझ्या घरी आले व त्यांनी त्यांचे नाव अमोल खाडे असे सांगून प्रांत कार्यालय दहीवडी येथील प्रांत मडम यांचे हाताखाली काम करीत असल्याचे सांगून त्यांनी मला तुम्ही विनापरवाना वाळू वाहतूक करत आहात, तुमच्या ट्रक्टची ट्रली म्हसवड पोलीस ठाणेचे परिसरात लावली आहे, तुमच्यावर प्रांत मडम कारवाई करणार आहेत असे सांगून तुम्हाला वाळू वाहतूक करायची असल्यास तुम्हाला प्रांत मडमची परवानगी घ्यावी लागणार असे सांगीतले. त्यावर मी अमोल खाडे यांना परवानगीसाठी काय करावे लागेल असे विचारले असता त्यांनी मला तुम्हाला जर या पुढे तुमच्या शेताजवळील ओढयातून वाळू उपसा करायचा असेल तर तुम्हाला मला महिन्याला 25000/- रूपये द्यावे लागतील असे सांगीतले. त्यावर मी त्यं ा 25000/- रूपये कसले असे विचारले असता. त्यं ानी मला 25000/- रूपये मी प्रांत मडमना देणार, प्रांत मडमनां 25000/- रूपये पोहचले नंतर तुम्ही वाळु उपसा करू शकता तसेच तुम्ही जर 25000/- दिले नाहीत तर तुम्हाला वाळु उपसा करता येणार नाही व तुमच्यावर वाळु उपसा केले बाबत कारवाई होईल. असे म्हणाले. त्यानंतर मी त्यं ाना प्रांत मडमंना भेटून वाळू उपसा परवाना मिळण्याबाबत विनंती करतो असे म्हणालो असता त्यांनी मला तुम्ही प्रांत मडमना या संदर्भात भेटू शकत नाही, जर तुम्ही भेटण्यास गेला तर प्रांत मडम तुमच्यावर वाळु उपसा केलेबाबत कारवाई करतील असे म्हणाले. त्यावेळी मी नाईलाजास्तव खाडे यांना ठिक

बाबत विचारले, त्यावर मी त्यांना वा

13. Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): GANESH SOPAN WAGHMODE(I (Inspector)) / DGPGSWM8401 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Rank (पद):
No.(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on **point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. **read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

भारत बाबा शिंदे

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

फिर्याद ची एक प्रत मोफत मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): GANESH SOPAN WAGHMODE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPGSWM8401

PN/545
पोलीस स्टेशन ऑफिसर
[illegible], पोलीस स्टेशन

## वर्दी जबाब ता.04/07/2020

मी भारत बाबा शिंदे वय 28 वर्ष व्यवसाय:- शेती रा. पाणवन ता. माण जि. सातारा मोबाईल नंबर. 8050712071.

मी वरील प्रमाणे असून मी वरील ठिकाणी माझी आई, पत्नी, एक मुलगी, एक मुलगा असे एकत्र राहण्यास आहे. माझी पाणवन ता. माण जि. सातारा या ठिकाणी साडेचार एकर शेत जमीन असून सदर शेतजमीनीस लागून ओढा जातो. सदर ओढयामध्ये बांधकामास लागणारी वाळू उपलब्ध आहे.

सात महिण्यापुर्वी मी पाणवन या ठिकाणी माझ्या घरालगत जनावरांसाठी गोठा बांधण्याचे ठरवले होते. सदर गोठ्याचे बांधकामासाठी मी माझ्या शेतमी भारत बाबा शिंदे वय 28 वर्ष व्यवसाय:- शेती रा. पाणवन ता. माण जि. सातारा मोबाईल नंबर. 8050712071.जमीनीलगत असलेले ओढ्यामधून वाळू घेण्याचे ठरवून ओढयातील वाळू उपसा करुन मी माझे चुलत भाऊ श्री.रामू भगवान शिंदे यांचे मालकीच्या ट्रॅक्टर - ट्रॉली मधून सदरची वाळू माझ्या गोठयाचे बांधकामा करिता घेवून जात होतो. त्यावेळी म्हसवड पोलीस ठाणेमधील पोलीस कर्मचारी यांनी आमचा ट्रॅक्टर आडवून विना परवाना वाळू उपसा केल्याबद्दल माझ्यावर कारवाई केली होती. त्यावेळी आमचा ट्रॅक्टर व ट्रॉली पोलीसांनी घेवून जावून पोलीस ठाणेचे परिसरात लावली होती. त्यावेळी आम्ही आमचा ट्रॅक्टर सोडवून आणलामी भारत बाबा शिंदे वय 28 वर्ष व्यवसाय:- शेती रा. पाणवन ता. माण जि. सातारा मोबाईल नंबर. 8050712071. होता परंतू ट्रॅक्टरची ट्रॉली पोलीसांनी सोडली नाही. सदरची ट्रॉली अद्याप म्हसवड पोलीस ठाणेचे परिसरातच आहे.

त्यानंतर मागील आठ दिवसापुर्वी मी माझ्या घरी असताना दुपारी साडे चार वाजण्याचे सुमारास एक अनोळखी इसम माझ्या घरी आले व त्यांनी त्यांचे नाव अमोल खाडे असे सांगून प्रांत कार्यालय दहीवडी येथील प्रांत मॅडम यांचे हाताखाली काम करीत असल्याचे सांगून त्यांनी मला तुम्ही विनापरवाना वाळू वाहतूक करत आहात, तुमच्या ट्रॅक्टची ट्रॉली म्हसवड पोलीस ठाणेचे परिसरात लावली आहे, तुमच्यावर प्रांत मॅडम कारवाई करणार आहेत असे सांगून तुम्हाला वाळू वाहतूक करायची असल्यास तुम्हाला प्रांत मॅडमची परवानगी घ्यावी लागणार असे सांगीतले. त्यावर मी अमोल खाडे यांना परवानगीसाठी काय करावे लागेल असे विचारले असता त्यांनी मला तुम्हाला जर या पुढे तुमच्या शेताजवळील ओढयातून वाळू उपसा करायचा असेल तर तुम्हाला मला महिन्याला 25000/- रूपये द्यावे लागतील असे सांगीतले. त्यावर मी त्यंा 25000/- रूपये कसले असे विचारले असता. त्यंानी मला 25000/- रूपये मी प्रांत मॅडमना देणार, प्रांत मॅडमनां 25000/- रूपये पोहचले नंतर तुम्ही वाळु उपसा करू शकता तसेच तुम्ही जर 25000/- दिले नाहीत तर तुम्हाला वाळु उपसा करता येणार नाही व तुमच्यावर वाळु उपसा केले बाबत कारवाई होईल. असे म्हणाले. त्यानंतर मी त्यंाना प्रांत मॅडमंना भेटून वाळू उपसा परवाना मिळण्याबाबत विनंती करतो असे म्हणालो असता त्यांनी मला तुम्ही प्रांत मॅडमना या संदर्भात भेटू शकत नाही, जर तुम्ही भेटण्यास गेला तर प्रांत मॅडम तुमच्यावर वाळु उपसा केलेबाबत कारवाई करतील असे म्हणाले. त्यावेळी मी नाईलाजास्तव खाडे यांना ठिक आहे असे म्हणून मी तुम्हाला संपर्क करतो असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी मला त्यांचा मोबाईल नंबर दिला व त्यांनी माझा मोबाईलनंबर घेतला. त्यानंतर ते निघून गेले.

त्यानंतर मी अमोल खाडे यांचेबाबत चौकशी केली असता अमोल खाडे हे प्रांत मॅडम यांचे वतीने वाळू व्यवसायीकांकडून हप्ता गोळा करतात व प्रांत मॅडम यांचे वाळूच्या कारवाई मध्ये सोबत असतात अशी माहिती मिळाली. त्याप्रमाणे अमोल खाडे माझ्याकडून देखील प्रांत मॅडम दहीवडी यांना देण्यासाठी महिण्याला 25000/- रूपये द्यावे लागतील म्हणून लाच मागत असल्याची माझी खात्री झाली. परंतू मला अमोल खाडे, खाजगी इसम यास लाच देण्याची इच्छा नाही.

मी जर अमोल खाडे यांना टॅक्टर ट्रॉलीने वाळू उपसा करण्यासाठी प्रत्येक महीन्याला 25000/-रुपये या प्रमाणे पैसे दिले नाहीत तर, प्रांत मॅडम दहीवडी या माझ्यावर कारवाई करतील. त्यामुळे मी नाईलाजापोठी अमोल खाडे यांस भेटून ट्रॅक्टर ट्रॉलीने वाळू उपसा करण्याची माझ्या कामाबाबत चर्चा करणार आहे. त्यांने माझेकडे दर महीना 25000/-रुपये या प्रमाणे लाचेची मागणी केली आहे. आमचे शेताचे जवळील ओढया मधून वाळू उपसा करण्यासाठी अमोल खाडे हे माझेकडे पुन्हा लाचेची मागणी करण्याची शक्यता असलेने मी दि.30.06.2020 रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय एसीबी पुणे येथे जावून पोलीस अधीक्षक श्री.राजेश बनसोडे यांना समक्ष भेटून माझी तक्रार सांगीतली होती. त्यांनी मला ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथील पोलीस निरीक्षक मोरे साहेब तुम्हाला संपर्क करतील असे सांगीतले होते. त्यानंतर मोरे साहेबांनी माझे मोबाईलवर संपर्क करुन मला दि.01.07.2020 रोजी म्हसवड ता.माण जि.सातारा येथे सकाळी 10.00 वा.चे सुमारास येवून तक्रार घेत असलेचे सांगीतले होते.

त्याप्रमाणे दि.01.07.2020 रोजी मोरे साहेब हे म्हसवड येथे सकाळी 10.00 वाजता आलेवर मी माझा लेखी तक्रारी अर्ज मोरे साहेबांचे समक्ष हजर केला. मी दिलेला अर्ज मोरे साहेबांनी वाचून पाहीला.

त्यावेळी मोरे साहेबांनी माझी व पंच साक्षीदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. तसेच सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मला माझी लाचलुचपतीची तक्रार दोन्ही पंचाना तोंडी सांगण्यास सांगीतली असता, मी माझी तक्रार दोन्ही पंचाना सांगीतली. त्यानंतर मोरे साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचणेस दिला. दोन्ही पंचानी तक्रारी अर्ज वाचून मी, तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे सांगून तक्रार वाचलेबाबत तक्रारी अर्जावर दोन्ही पंचानी व मोरे साहेबांनी सहया केल्या.

अमोल खाडे, खाजगी इसम यांचे लाच मागणीचे कृत्य भ्रष्टाचार प्रतिबंधअधिनियमाखाली दखलपात्र गुन्हा होत असल्याने माझ्या तक्रारीची पडताळणी करुन अमोल खाडे यांचेविरुध्द लाचलुचपतीचा सापळा लावण्याचे मोरे साहेबांनी निश्चित केले.

त्यानंतर मोरे साहेबांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकॉर्डर व नविन मेमरी कार्डबाबत माहिती दिली व पडताळणी कामी मला व पंच नं.1 यांना आवश्यक त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मोरे साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंचासमक्ष मी माझे मोबाईवरून अमोल खाडे खाजगी इसम यांना कॉल करून माझे मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला. अमोल खाडे यांनी माझा कॉल रिसीव्ह केल्यानंतर लागलीच मोरे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे समोर धरला असता

मी खाडे यांना अमोल दादा कुटाय असे विचारले असता, त्यांनी पळशीत असलेचे सांगून त्यांनी मला तुमच्याकड वाहण कुटलाय? असे विचारले असता मी त्यांना ट्रक्टर आहे व मित्राचा डंपर आणनार असले बाबत सांगीतले. त्यावेळी अमोल खाडे यांनी म्हसवड येथे आलेवर फोन करतो असे सांगीतले म्हणून मी माझा मोबाईल बंद केला. त्यानंतर मोरे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन माझे व अमोल खाडे यांचेमध्ये झालेले संभाषण मी, मोरे साहेब व पंचानी ऐकून ते ध्वनीमुद्रीत झालेची खात्री केली.

त्यानंतर बराच वेळ झाला तरी अमोल खाडे यांचा फोन न आलेने माझे मोबाईलवरुन अमोल खाडे खाजगी इसम यांचे मोबाईलवर फोन लावणेचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर मोरे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोबाईलवरुन अमोल खाडे यांना कॉल केला व माझे मोबाईलचा स्पिकर ऑन केला. अमोल खाडे यांनी माझा कॉल रिसीव्ह केल्यानंतर लागलीच मोरे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे समोर धरला त्यावेळी अमोल खाडे यांनी मला पिलीवमध्ये असलेचे सांगून म्हसवडमध्ये आलेनंतर कॉल करतो असे सांगीतले आमचेत काही वेळ चर्चा आलेवर मी मोबाईल बंद केला. त्यानंतर मोरे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन माझे व अमोल खाडे यांचेमध्ये झालेले संभाषण मी, मोरे साहेब व पंचानी ऐकून ते ध्वनीमुद्रीत झालेची खात्री केली.

त्यानंतर बराच वेळ झाला तरी अमोल खाडे यांचा मला फोन न आलेने मोरे साहेबांनी मला माझे मोबाईलवरुन अमोल खाडे यांचे मोबाईलवर फोन करणेस सांगीतले असता मी माझे मोबाईलवरुन अमोल खाडे यांचे मोबाईलवर दोन वेळा फोन केला असता अमोल खाडे यांचा मोबाईल लागला नाही.

अमोल खाडे खाजगी इसम यांनी वाळू उपश्यासंदर्भात माझेकडे लाच मागणी करण्याची शक्यता वाटत असल्याने मोरे साहेबांनी अमोल खाडे यांनी अगर अन्य कोणी मला संपर्क केल्यास तात्काळ आम्हाला संपर्क करण्याबाबत व सदरबाबत गोपनीयता राखण्याबाबत सुचना देवून मला जाणेस सांगून ते सांगली करीता निघून गेले.

दि.02.07.2020 रोजी माझे मित्र नामदेव महादेव शिंदे यांनी मला कळवीले की, त्यांना त्यांचे चुलत भाऊ जयराम शिंदे यांनी फोन करुन ते व खाडे असे मला उदया भेटायला येत असलेबाबत कळवीले. त्यानंतर सदरबाबत मी मोरे साहेबांना कळवीले. त्यावेळी मोरे साहेबांनी उद्ईक दि.03.07.2020 रोजी सकाळी 09.15 वाजता नागोबा मंदीर म्हसवड याठिकाणी आलेवर संपर्क केलेवर त्या ठिकाणी येणेबाबत कळवीले.

त्याप्रमाणे दि.03.07.2020 रोजी सकाळी 09.20 वा.चे सुमारास मोरे साहेबांनी मला फोन करुन नगोबा मंदीर परीसरात आला असलेचे सांगून त्याठिकाणी येणेबाबत कळवीले. त्याप्रमाणे मी व माझा मित्र नामदेव शिंदे असे माझे मोटर सायकल वरुन मोरे साहेब व सापळा पथक थांबले ठिकाणी आलो. त्यावेळी मी माझे मित्र नामदेव शिंदे यांची मोरे साहेबांना ओळख करुन दिली.

त्यानंतर पडताळणीच्या वेळी माझे, अमोल खाडे यांचेत होणारे संभाषण पुराव्याचे कामी ध्वनीमुद्रीत करण्याचे मोरे साहेब यांनी निश्चित केले. त्यानंतर मोरे साहेब यांनी कार्यालयाकडील डीजीटल व्हाईस रेकॅार्डर दाखवुन त्याबाबत माहिती व आवश्यक त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मोरे साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंचासमक्ष मी माझे मोबाईवरून अमोल खाडे यांना कॉल करून माझे मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला. अमोल खाडे यांनी माझा कॉल रिसीव्ह केल्यानंतर लागलीच मोरे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे समोर धरला असता अमोल खाडे यांनी मला ते आणी जयराम मला दुपारी भेटायला येत असलेबाबत सांगीतले. त्यानतर मी माझा

मोबाईल बंद केला. त्यानंतर मोरे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन माझे व अमोल खाडे यांचेमध्ये झालेले संभाषण मी, मोरे साहेब व पंचांनी ऐकून ते घ्वनीमुद्रीत झालेची खात्री केली.

त्यानंतर दुपारी 3 वा.चे सुमारास माझा मित्र नामदेव शिंदे यांचे मोबाईलवर जयराम शिंदे यांने फोन करुन अमोल खाडे हा पळशी फाटयावर येणार आहे. तुम्ही म्हसवड स्टॅन्ड जवळ या, आपण तेथून जावू या असे कळवीले. त्याबाबत मित्र नामदेव यांने मला व मोरे साहेबांना सांगीतले.

त्यानंतर पडताळणीच्या वेळी माझे, अमोल खाडे व जयराम शिंदे यांचेत होणारे संभाषण पुराव्याचे कामी ध्वनीमुद्रीत करण्याचे मोरे साहेब यांनी निश्चित केले. त्यानंतर मोरे साहेब यांनी कार्यालयाकडील डीजीटल व्हाईस रेकॅार्डर दाखवुन त्याबाबत माहिती व आवश्यक त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझेकडे दिला. तो मी माझे अंगावरील पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. मुदलीयार यांना अमोल खाडे व जयराम शिंदे यांची भेट घेणेस जाणेकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 श्री. मुदलीयार असे माझेकडील मोटरसायकल वरून रवाना होवून पळशी फाटयावर गेलो. त्याठिकाणी मी माझेकडील मोटर सायकल पार्क केली. जवळ जयराम शिंदे व अमोल खाडे असे मोटर सायकली सोबत थांबलेले होते. ते दोघे आम्हाला पाहून आमचे जवळ आले. त्यावेळी अमोल खाडे व जयराम शिंदे यांचेत चर्चा सुरु होती. त्यानंतर मी अमोल खाडे यांनी कस कस करायच असं विचारले, त्यावर अमोल खाडे यांनी तुम्हाला सगळं माहीतच आहे असे म्हणाले, त्यावर मी अमोल खाडे यांना मला काय माहीत नसलेचे सांगून मी यात नविनच उतरलो आहे असे म्हणालो, त्यावर अमोल खाडे यांने मला तुम्ही काय काय चालू करणार आहे, वाहन कोणते आहे असे विचारले, त्यावर मी अमोल खाडे यांना माझेकडे ट्रॅक्टर व डंपर आहे असे सांगीतले. त्यावर अमोल खाडे यांनी मला वाहनाचे नंबर बाबत विचारले, त्यावर मी त्यांना वाहनाचे नंबर मला माहीत नाहीत मी नंतर देतो असे सांगीतले. त्यावर अमोल खाडे यांनी मला दोन्हीचे 25-25 होतात असे म्हणून दोन्ही वाहनाचे 25-25 असे मिळून 50,000/-रुपये सांगीतले. व अमोल खाडे यंनी सध्या तुम्ही डंपर चालू करु नका ट्रॅक्टरचे 25 होतात असे सांगीतले. त्यावेळी मी त्यात कायतर कमी करा असे म्हणालो, त्यावर जयराम शिंदे यांनी मला हप्त्यात काय कमी होत नाही. त्याला कॉप्रमाईज नाही असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ठिक आहे असे म्हणून कुठे दयायचे व कसे दयायचे त्यावेळी अमोल खाडे यांनी मला आता असतील तर आता दे असे म्हणाले व जयराम शिंदे यांनी मला आता असेल तर आत्ता दे नसेल तर परत खाडे ला आणुन दे असे म्हणाले, त्यावर अमोल खाडे यांनी मला माझेकडे नको जयरामकडे दे असे सांगीतले. त्यानंतर मी बर ठिक आहे, मॅडमच कस अस विचारल, त्यावर अमोल खाडे यांनी त्यांचा विषय सोडा असे म्हणाले, त्यानंतर मी त्यांना ठिक आहे असे म्हणून कुठे आणून देवू असे आणून देवू असे विचारले असता, अमोल खाडे यांने मला म्हसवडला असेलतर जयरामकडे दे नसेलतर जयरामला कॉन्टेक्ट कर असे म्हणाले, त्यावर मी दोन तासांत आणून देतो असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे त्या ठिकाणावरून निघून माझे मोटर सायकलवरुन मोरे साहेब थांबले ठिकाणी हजर झालो. मोरे साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. व मला तसेच पंच नं.1 मुदलीयार यांना घडलेली हकीकत विचारली आम्ही दोघांनी त्यांना हकीकत सांगीतली.

सापळ्याचे वेळी माझे तसेच जयराम शिंदे व अमोल खाडे यांचेत होणारे संभाषण पुराव्याचे कामी ध्वनीमुद्रीत करण्याचे मोरे साहेब यांनी निश्चित केले. त्यानंतर मोरे साहेब यांनी कार्यालयाकडील डीजीटल व्हाईस रेकॅार्डर व नविन मेमरीकार्ड दाखवुन त्याबाबत माहिती दिली.

त्यानंतर मोरे साहेब यांनी दिले सुचने प्रमाणे मी माझेकडील 25,000/-रुपये रक्कम त्यांचे समोर हजर केली. त्यामध्ये 2,000/-रुपये दराच्या 12 नोटा व 500/- रुपये दराच्या 02 नोटा होत्या. मोरे साहेब यांनी ॲथ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगीतले. त्यानंतर पोहेकॉ.संकपाळ यांनी 25,000/-रुपये रकमेच्या नोटांना ॲथ्रासिन पावडर लावून ती लाच रक्कम जयराम शिंदे व अमोल खाडे यांनी मागणी केलेनंतर त्यांना देणेसाठी माझे शर्टचे समोरील डावे बाजेचे खिशात ठेवली.

त्यानंतर मोरे साहेब यांनी नविन मेमरी कार्ड दोन्ही पंचाना दाखवून त्याबाबत माहीती दिली. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला, पंच नं.1 व पंच नं.2 तसेच सापळा पथकास सापळयाचे कामी आवश्यक त्या सुचना दिल्या. मोरे साहेबांनी माझा मित्र नामदेव शिंदे यांस सदर बाबत गोपनीयता राखण्याच्या सुचना देवून त्यास जाणेस सांगीतले, त्याप्रमाणे तो निघून गेला.

त्यानंतर मोरे साहेब यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर माझेकडे दिला, तो मी माझे पॅन्टच्या समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला व पंच नं. 1 श्री. मुदलीयार यांना जयराज शिंदे व अमोल खाडे यांची भेट घेणेकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 श्री. मुदलीयार असे माझेकडील मोटरसायकल वरून

रवाना झालो.

माझे पाठोपाठ मोरे साहेब, पंच नं. 2 व सापळा पथक असे असे खाजगी तवेरा गाडी मधून रवाना झाले.

मी मोटर सायकल नागोबा मंदीर कमान मार्गे म्हसवड एस.टी. स्टॅन्टचे अलीकडे जावून माझी मोटर सायकल रोडकडेला थांबवून मी व पंच नं.1 असे मोटर सायकलवरुन उतरुन थांबलो. काही वेळातच जयराम शिंदे यांचा मला फोन आला. व त्यांने मला कुठे आहे असे विचारले असता, मी त्यांना स्टॅन्ड जवळ आलेचे सांगीतले, काही वेळातच जयराम शिंदे व अमोल खाडे असे आम्ही थांबलो त्याठिकाणी आले. जयराम शिंदे माझे जवळ थांबले व थोडयाच अंतरावर अमोल खाडे जावून थांबले. त्यावेळी मी अमोल खाडे यांना पैसे घेवून आलेचे सांगीतले, त्यावेळी जयराम शिंदे यांनी मला प्रथम नको असे म्हणाले, त्यावेळी मी त्यांना अमोल खाडे यांनी तुमच्याकडं दयायला सांगीतले होते. त्यावेळी जयराम शिंदे यांनी त्यांचा उजवा हात पुढे करुन लाच मागणी बाबत इशारा केला. त्यानंतर मी माझे शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने बाहेर काढुन जयराम शिंदे यांचेसमोर धरली असता जयराम शिंदे यांनी सदरची लाच रक्कम त्याचे उजवे हाताने स्वीकारली, लागलीच मी माझा डावा हात डोकीवरून फिरवून लाच स्विकारलेबाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी मोरे साहेब व सापळा पथक माझे जवळ आले. मोरे साहेबांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन त्यांचे ताबेत घेतला. त्यावेळी पंच नं.1 यांनी मोरे साहेबांना जयराम शिंदे यांचेकडे बोट करुन ते जयराम शिंदे असलेचे सांगून जयराम शिंदे यांने लाच स्विकारलेचे सांगून जवळच थांबलेले अमोल खाडे यांचेकडे बोट करुन ते अमोल खाडे असलेचे सांगीतले. त्यावेळी मोरे साहेबांनी मला बाजूला जावून थांबणेस सांगीतले.

त्यानंतर मोरे साहेब व पंच नं.2 व सापळा पथक असे जयराम शिंदे व अमोल खाडे यांना ताब्यात घेवून खाजगी तवेरा गाडीमध्ये घेवून गेले.

त्यानंतर काही वेळाने मोरे साहेबांनी मला खाजगी तवेरा गाडीमध्ये बोलावून घेवून अंधारामध्ये माझे हात व कपडे अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासून पाहिले असता माझे उजवे हाताचे बोटाचे पेऱ्यास व शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशाचे तोंडास व आतील बाजुस अॅ.पा.ची चकाकी दिसून आली. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला गाडीमधून बाहेर जावुन थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी गाडीमधून बाहेर जावुन थांबलो.

त्यानंतर सापळा पथक असे अमोल खाडे व जयराम शिंदे याला घेवून तवेरा गाडीतून मी थांबलो ठिकाणी घेवून आले. त्यावेळी मला मोरे साहेब यांनी बोलावून घेवून म्हसवड पोलीस ठाणे येथे येणेबाबत सांगितले. त्यानंतर मोरे साहेबांनी माझे मोबाईलवर संपर्क करुन मला व्ही.के.रिसोर्ट येथे येणेबाबत सांगीतले. त्याप्रमाणे मी माझी मोटार सायकल घेवून व्ही.के.रिसोर्ड येथे हजर झालो. काही वेळाने मोरे साहेब व सापळा पथक असे अमोल खाडे व जयराम शिंदे याला सोबत घेवून व्ही.के.रिसोर्ट येथे दाखल झाले. त्यावेळी मोरे साहेबांनी मला बाहेर थांबणेस सांगीतले,

त्याप्रमाणे मी रिसोर्टचे बाहेर थांबलो. मोरे साहेबांनी त्यांची पुढील कारवाई सुरु ठेवली. त्यांनतर थोडयावेळाने मोरे साहेबांनी मला व्ही.के.रिसोर्टचे पहील्या मजल्यावरील खोलीमध्ये बोलावून घेवून त्यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली, त्यानंतर मला खोलीच्या बाहेर जावून थांबण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी बाहेर जावून थांबलो. त्यानंतर थोडया वेळाने मोरे साहेब यांनी पुन्हा मला रिसोर्ट मधील पहील्या मजल्यावरील खोलीमध्ये बोलावुन घेवुन सापळयाची हकीकत विचारली. त्यावेळी मी त्यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगीतली. मोरे साहेबांनी घडले घटनेचा सविस्तर पंचनामा केला.

तरी दि.01.07.2020 रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मोरे साहेब यांनी दि.03.07.2020 रोजी केले पडताळणी कारवाई मध्ये अमोल खाडे व जयराम शिंदे यांनी आमचे शेताचे जवळ असले ओढया मधून ट्रॅक्टरने वाळू उपसा करणेसाठी प्रांत मॅडम दहीवडी यांचे नांव सांगून माझेकडे 25,000/-रुपये लाचेची मागणी करुन ती 25000/-रुपये लाच रक्कम जयराम शिंदे यांने म्हसवड एस.टी.स्टॅन्डचे जवळ रोडवर माझेकडून स्विकारली आहे. म्हणून 1) अमोल अदीनाथ खाडे, रा. पळशी ता. माण जि.सातारा 2 ) जयराम विठ्ठल शिंदे, रा. पानवल ता.माण जि.सातारा यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

माझा वर्दी जबाब मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेला आहे.

समक्ष

हा दिला वर्दीजबाब,

भरत बा बा शिंदे